सोमवार २७ जानेवारी २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत          संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक : १३३ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

# पालकमंत्र्यांनी जल जीवन मिशनचा घेतला आढावा

**लोकनेता न्युज नेटवर्क**
**बुलढाणा (ज्ञानेश्वर बुधवत)**

जिल्ह्याचे नवनियुक्त पालकमंत्री ना.मकरंद पाटील हे जिल्ह्यात दाखल झाले असून त्यांनी शनिवारी जिल्ह्यातील विकासकामे, योजना, प्रकल्पांसह संपूर्ण जिल्ह्याचा आढावा घेतला.

जल जीवन मिशनच्या अर्धवट अवस्थेत असलेल्या कामाच्या बातम्या अनेक वृत्तपत्रात प्रसिद्ध देखील झाल्या आहेत. तर काही वृत्तपत्रानद्वारे तालुक्यातील बट्याबोल झालेल्या जल जीवन मिशनकडे जिल्ह्याचे पालकमंत्री लक्ष घालतील का असा आशावाद व्यक्त करण्यात आला होता, त्याच अनुसंघाने आता जिल्हा आढावा बैठकीत पालकमंत्र्यांनी चर्चा केली असून यावर पालकमंत्री काय निर्णय घेणार आहेत या कडे सर्वांचे लक्ष लागले आहे..

जिल्हाधिकारी कार्यालयातील जिजाऊ सभागृहात झालेल्या या प्रशासकीय विभागांच्या आढावा बैठकीला आमदार संजय गायकवाड, आमदार सिद्धार्थ खरात, आमदार मनोज कायंदे, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील,




मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात, पोलीस अधीक्षक विश्व पानसरे, अपर जिल्हाधिकारी सदाशीव शेलार यांचेसह उपविभागीय अधिकारी, विविध विभागांचे प्रमुख उपस्थित आहेत. पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांनी या बैठकीत जिल्ह्यातील ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि आर्थिक स्थितीसह कृषी, शिक्षण, आरोग्य, उद्योग, सिंचन प्रकल्प, पर्यटन, रस्ते व रेल्वे प्रकल्प, वैद्यकीय व आयुर्वेद महाविद्यालय, सिंदखेड राजा व लोणार विकास आराखडा, वने, नगरविकास, एसटी बस व डेपो, ई-नाम सुविधा, शेततळे, घरकूल, अंगणवाडी, प्राथमिक आरोग्य केंद्र, कौशल्य विकास व रोजगार, प्रधानमंत्री पीक विमा योजना, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी प्रकल्प, प्रधानमंत्री सुर्यघर योजना, आवास योजना, जन आरोग्य योजना, प्रधानमंत्री व मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना, जलजीवन मिशन, मनरेगा यासह विविध विषयांचा आढावा घेतला.

या बैठकीच्या सुरुवातीला पालकमंत्र्यांनी सर्व प्रशासकीय विभागांच्या प्रमुख अधिकाऱ्यांचा परिचय करुन घेतला. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी जिल्ह्यातील विविध विकास कामे, प्रकल्प, योजना, उपक्रमांच्या सद्यस्थितीची माहिती सादरीकरणाद्वारे दिली.

## ३२९ उपकेंद्रे कंत्राटी चालविण्यास कृती समितीचा विरोध



**लोकनेता न्युज नेटवर्क**
**नांदेड बाजीराव गायकवाड**

राज्यातील महावितरणची २०१९ नंतरची ३२९ विज उपकेंद्रे शासनाने खाजगी कंत्राटदारांना कंत्राटी पद्धतीने चालविण्यास देण्यासाठी टेंडर काढले असून हे उपकेंद्र कंत्राटी पद्धतीने देऊ नये म्हणून संयुक्त कृती समितीच्या वतीने तीव्र विरोध करण्यात आला असून त्याबाबतचे निवेदन महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचेकडे संयुक्त कृती समितीने दिले आहे.

राज्यातील महावितरणची २०१९ नंतरची ३२९ उपकेंद्रे ही कंत्राटी पद्धतीने चालविण्यास देण्याची निविदा प्रकाशित करण्यात आली असून या प्रक्रियेच्या माध्यमातून महावितरण कंपनीची ३२९ उपकेंद्र हे खाजगी ठेकेदारास मनुष्यबळ पुरविणे व देखभाल दुरुस्ती व संचलन करण्याचे टेंडर काढण्यात आले आहे. महावितरण कंपनीमध्ये उपकेंद्राकरिता मंजूर असलेल्या स्थायी स्वरूपाच्या यंत्रचालकाच्या पदावर कंत्राटी पद्धतीने चालविण्यात देण्यास कृती समिती तीव्र आणि सक्त विरोध आहे. महावितरण कंपनीच्या प्रशासनाने यापूर्वी अनेक वेळा कृती समिती समोर चर्चा करताना २०१९ नंतरच्या सर्व उपकेंद्रा यंत्रचालकाची पदे मंजूर करण्यातचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात असून मंजुरीनंतर तो लागू करण्यात येईल असे आश्वासन दिलेले होते. मग अचानक पणे ३२९ उपकेंद्रे खाजगी ठेकेदारांना चालविण्यात देण्याचा निर्णय का देण्यात आला असा प्रश्न सर्व संघटना व कामगारांमध्ये निर्माण झाला आहे. महावितरण कंपनीने सध्या मंजूर असलेली एक ते चार प्रवर्गातील ३२००० च्या वर पदे रिक्त आहेत.व रिक्त पदे भरण्याची मागणी कृती समितीच्या माध्यमातून सरकार व व्यवस्थापनास वेळोवेळी केलेली आहे. अनेक वेळा प्रशासनाने रिक्त पदे तातडीने भरण्याची लेखी कार्य वृत्त कृती समितीस दिलेले आहे. कामगार भरतीची प्रक्रिया संथ गतीने सुरू असून मंजूर असलेल्या पदावर कंत्राटी पद्धतीने यंत्रचालकाची पदे भरणे म्हणजे खाजगीकरणाची प्रक्रिया सुरू करणे असा कृती समितीचा स्पष्ट आरोप व्यवस्थापनावर आहे. महावितरण कंपनीच्या व्यवस्थापन कंपनीच्या व्यवस्थापनाने २०१९ नंतर निर्माण झालेल्या सर्व उपकेंद्राकरिता यंत्रचालकाची स्थायी पदे मंजूर न करता ती कंत्राटी पद्धतीने भरण्याची प्रक्रिया सुरू केल्यामुळे हजारो यंत्रचालकांच्या पदोन्नतीचा मार्ग रोधीत होणार आहे. व्यवस्थापनाने खाजगी ठेकेदारांना उपकेंद्रे चालविण्यात देण्याची निविदा तात्काळ रद्द करावी. तसेच महावितरण कंपनीच्या कोणत्याही कार्यालयात खाजगी ठेकेदार किंवा एजन्सी यांना कार्यालयासाठी किंवा इतर कामकाजासाठी जागा उपलब्ध करून देऊ नये. अन्यथा कृती समितीस त्या विरोधात आंदोलन करावे लागेल. आंदोलनामुळे औद्योगिक शांतता व भंग झाल्यास त्यात प्रशासन जबाबदार राहील. याची नोंद प्रशासनाने घ्यावी असे दिलेल्या निवेदनामध्ये संयुक्त कृती समितीचे वर्कर्स फेडरेशनचे सरचिटणीस कृष्णा भोयर ,महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे अरुण पिवळ, सब आर्डीनेट इंजिनियर असोसिएशनचे संतोष खुमकर, विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियनचे आर टी देवकांत ,वीज कामगार काँग्रेस इंटकचे दत्तात्रय गुट्टे ,महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेचे प्रेमानंद मौर्य, वीज तांत्रिक कामगार संघटनेची हाजी सय्यद जहिरोद्दीन यांनी निवेदनात म्हटले आहे. याबाबतची माहिती कामगार नेते विजय रणखांब संजय टाक, मोईन शेख,बालाजी सकरगे, यांनी दिली आहे.

## लासलगाव महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा



**लोकनेता न्युज नेटवर्क**

**लासलगाव :–** नूतन विद्या प्रसारक मंडळ संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लासलगाव येथे आज ७६ वा प्रजासत्ताक दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. आपले संविधान २६ जानेवारी १९५० पासून अंमलात आले असून, आपल्या संविधानाची पुरेशी माहिती समाजातील प्रत्येक नागरिकाला समजणे आवश्यक आहे,

त्याचप्रमाणे भारतीय राज्यघटनेतील न्याय, स्वातंत्र्य, समानता व बंधुता ही मूलतत्त्वे मनावर कोरली जावीत यासाठी संविधानाचा परिचय होण्याच्या हेतूने दरवर्षीप्रमाणे ध्वजारोहन कार्यक्रमापूर्वी भारताच्या संविधानातील उद्देशिकेचे वाचन प्राचार्य डॉ.आदिनाथ मोरे यांनी केले. तत्पूर्वी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे माजी आमदार कल्याणराव पाटील यांच्या शुभहस्ते ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला, याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे चेअरमन प्रकाश पाटील, संस्थेचे जनरल सेक्रेटरी गोविंदराव होळकर, मॅनेजिंग बोर्डाचे सदस्य भाऊसाहेब रायते, संजय होळकर, चंद्रशेखर भावसार, हसमुखभाई पटेल, अनिल डागा, संजय पाटील, संदीप होळकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आदिनाथ मोरे, उपप्राचार्य प्रा.भूषण हिरे, डॉ.सोमनाथ आरोटे, पर्यवेक्षक उज्वल शेलार, संस्थेच्या इंग्लिश मीडियम च्या प्राचार्या शितल आचार्य इत्यादी उपस्थित होते. यावेळी सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एनसीसी ऑफिसर बापू शेळके यांनी केले.



## कुदळा येथे सेवा सहकारी सोसायटीच्या वतीने प्रजासत्ताक दिन साजरा!

**लोकनेता न्युज नेटवर्क**

**उमरी / किशन गायकवाड :–** कुदळा ता उमरी येथे सकाळी आठ वाजता सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन सिताराम प्रकाश जाधव यांच्या हस्ते राष्ट्रीय ध्वज फडकवित आला असून प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला आहे. सदरील कार्यक्रमांत पत्रकार तथा ग्रामपंचायत सदस्य किशनदादा गायकवाड कुदळेकर, रविंद्र गायकवाड कुदळेकर तालुका अध्यक्ष भाजपा अनुसूचित जाती मोर्चा ता उमरी, संभाजी रामा गायकवाड, देविदास पाटील वकील, निलुअप्पा मठपती, वैजनाथ मठपती, गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठया प्रमाणात उपस्थित होते.

## धानोरा बु.ग्रामपंचायत येथे ७६ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**लोकनेता न्यूज नेटवर्क / उमरी महेश पडोळे**




उमरी :–तालुक्यातील मौ.धानोरा बु.ग्रामपंचायत कार्यालय येथे प्रजासत्ताक दिन महात्मा गांधी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून पुजन करुन झेंडावंदन कर्तव्यदक्ष सरपंच ईरबा तुकाराम टोंम्पे याच्या शुभ हस्ते करण्यात आला आहे.सदर ,शारदा विद्यालय,अंगणवाडी, आरोग्य विभाग,

( पान – २ वर)




## नेहरू युवा केंद्र नांदेड, युवा कार्यकम व खेळ मंत्रालय, भारत सरकार कार्यालयाच्या वतीने राष्ट्रीय सडक सुरक्षा अभियानाचा समारोप

**लोकनेता न्युज नेटवर्क**

**अर्धापूर (संदीप कदम) :–** दि. १७ ते २३ जानेवारी २०२५ या कालावधीमध्ये नेहरू युवा केंद्र नांदेड तर्फे विविध कायकमाचे आयोजन करण्यात आले. या अभियानाचा समारोप दि २४ जानेवारी २०२५ रोजी श्री गुरु गोंबिदसिंघजी शासकिय औद्योगीक प्रशिक्षण संस्था येथे संपन्न झाला. या कार्यक्रमाला मोटार वाहन निरीक्षक श्रीमती रेणुका राठोड व जसपालसिंग कोटीतिर्थवाले वाहतुक विभाग, पोलीस अधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाची प्रास्ताविकामध्ये अपकाघातामध्ये आपल्या घरची व्यक्ती गेली तर घराची वाताहात होते. आतापर्यंत झालेल्या अपघातामध्ये युवकांचे प्रमाण जास्त असुन विना परवाना, सुसाट वेगात वाहणे चालवल्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे. अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी वाहनाचा वेग मर्यादीत असणे गरजेचे आहे व परवाना घेवुनच वाहन चालवणे हिच ख–या अर्थाने राष्ट्रीय सडक

( पान – २ वर)

# पत्रकारिता आणि समाजसेवेचा गौरव
# जीवन गौरव व समाजभूषण पुरस्कार सोहळा

**लेख : संजय पाटील,**
**एस्सेनेट टेक्नॉलॉजीज**
**लोकनेता न्युज नेटवर्क**

आज प्रजासत्ताक दिन व पत्रकार दिनाचे औचित्य साधून, नवीन नाशिक पत्रकार संघाने ''जीवन गौरव व समाजभूषण पुरस्कार'' प्रदान करण्याचा कार्यक्रम आयोजित केला. हा कार्यक्रम द ईन्स्टिट्युट ऑफ इंजिनिअर्स हॉल, नाशिक येथे संपन्न झाला. सकाळचे वरिष्ठ पत्रकार श्री प्रमोद दंडगव्हाळ आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी हा भव्य कार्यक्रम यशस्वीपणे आयोजित केला होता.

कार्यक्रमास महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास मंत्री माननीय श्री. गिरीश महाजन, नाशिक पश्चिमच्या आमदार माननीय सौ. सिमाताई हिरे, भाजपाचे सहमुख्य प्रवक्ता मा. अजित चव्हाण, नाशिकचे खासदार मा. राजाभाऊ वाजे, उ.बा.ठा. चे नाशिक जिल्हाध्यक्ष माननीय सुधाकरभाऊ बडगुजर, नाशिक शहर पोलीस आयुक्त मा. संदीप कर्णिक, मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष व ज्येष्ठ पत्रकार श्री. उतमराव कांबळे, तसेच वंचित बहुजन आघाडीचे मा. शिंदे व अंबड पोलीस स्टेशनचे पी.आय. श्री. पवार साहेब, पपया नर्सरी अंतर्गत सेंद्रिय खत प्रकल्प प्रमुख श्री संजय भामरे या सर्व मान्यवरांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

कार्यक्रमात नाशिक शहरातील साहित्यिक, लेखक आणि पत्रकार यांनाही आमंत्रित करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व ज्येष्ठ पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.

या विशेष कार्यक्रमात मा. मंत्री श्री. गिरीश महाजन यांच्या हस्ते श्री. उतमराव कांबळे यांना ''जीवन गौरव'' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांना एक लाख रुपयांचा धनादेश आणि प्रशस्तिपत्र देऊन गौरवण्यात आले. याशिवाय, विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या ज्येष्ठ पत्रकार आणि नागरिकांना ''समाजभूषण'' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. काही पत्रकारांना हेल्मेट व सायकल भेट स्वरूपात देण्यात आली, ज्यामुळे त्यांच्या सुरक्षिततेवर विशेष भर दिला गेला.सकाळचे सहसंपादक आणि जयशंकर विजयांगण सीनियर सिटीझन्स क्लबचे अध्यक्ष मा. विजय इंगळे व श्री.बापूराव सोमनाथ पवार, सरस्वती विद्यालय नाशिक यांनाही समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नाशिकमधील डॉक्टर्स, इंजिनिअर्स, साहित्यिक यांनाही समाजभूषण पुरस्कार प्रदान करून त्यांच्या कार्याची दखल घेतली गेली.

कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांनी प्रेरणादायी भाषणे केली. शेवटी मा. अजित चव्हाण यांनी समारोपाचे भाषण केले आणि या कार्यक्रमाचे महत्त्व अधोरेखित केले.हा कार्यक्रम नव्या उमेदीने आणि पत्रकारितेच्या योगदानाला सलाम करणारा ठरला. समाजासाठी योगदान देणाऱ्या प्रत्येकाचा गौरव करणे, हीच या कार्यक्रमाची खरी भावना होती.



## प्रजासत्ताक दिनानिमित्त नांदुसा जि.प.शाळेत सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न

**लोकनेता न्युज नेटवर्क नांदेड बाजीराव गायकवाड**

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा नांदुसा शाळेच्या वतीने प्रजासत्ताक दिनानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात क आला होता यावेळी बालकलाकार प्रगती बालाजी गंगातीरे या मुलीने अतिशय सुंदर नृत्य सादर करून सर्वाचे मन जिंकले यावेळी शाळेचे मुख्याध्यापक पऊळ सर यांनी प्रगती गंगातिरे चे अभिनंदन केले.अशी माहिती टि.व्ही.स्टार सीमा जनकवाडे यांनी दिली.

( पान – १ वरून )

## नेहरू युवा केंद्र नांदेड, युवा कार्यकम व खेळ मंत्रालय, भारत सरकार कार्यालयाच्या वतीने राष्ट्रीय ...

सुरक्षा अभियानाला गती मिळेल, असे प्रास्ताविकात श्रीमती चंदा रावळकर, जिल्हा युवा अधिकारी यांनी सांगीतले आहे. जसपालसिंग कोटीतिर्थवाले यांनी आपल्या भाषणात सांगीतले की, आपण वाहण चालवताना नियमाचे पालन न केल्यामुळे आपणास दंड लागतो जेणे करून आपण पुढे अशा चुका करू नये, या उद्देशाने आपणास दंड करण्यात येतो व सिटबेल्ट लावुन आपला जिव वाचवावा. असे त्यांने आपल्या भाषणात नमुद केले.श्रीमती रेणुका राठोड, मोटार वाहन निरिक्षक यांनी वाहतुकीचे नियम, चिन्ह व वाहन परवाना असल्याशिवाय विद्यार्थीनी वाहन चालवु नये अन्यथा विद्यार्थाचे नुकसान होऊन कोर्ट कचेरीला सामोर जावे लागते, व मोटार वाहतूक नियमाबछ्दल सखोल मार्गदर्शन केलेअसे सांगीतले.या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रीय सडक सुरक्षा अभियानीची सामुहिक शपथ विद्यार्थ्यांना देण्यात आली. या कार्यकमाचा लाभ संस्थेतील विद्यार्थानी घेतला. या कार्यक्रमासाठी एन.एस.एस. विभागाचे मोहन कलबरकर यांनी सुत्रसंचालन केले तर आभार प्रदर्शन फरजाना पठान यांनी केले. या राष्ट्रीय सडक सुरक्षा अभियानाचा समारोप करण्यात आला.

( पान – १ वरून )

# धानोरा बु.ग्रामपंचायत येथे ७६ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

जि.प.कें.प्राथमिक शाळा,क्रांती इंग्लिश स्कुल विद्यार्थी, शिक्षक वृंद ग्रामपंचायत कार्यालय प्रांगणात उभे राहून राष्ट्रध्वजाला सलामी देत राष्ट्रगीत म्हणले आहेत.भारताचा ७६ वा प्रजासत्ताक दिन चिरायू होवो!

अनेक देशांची राज्यघटना ही ब्रिटिशांनीच लिहिली. आपल्या देशाची राज्यघटना ही स्वतंत्र असावी म्हणून आपल्या स्वातंत्र्य लढ्यातील वीरांचा होता, देशाची स्वतंत्र अशी राज्यघटना २६ जानेवारी १९५० रोजी अमलात आणल्या गेली. लोकशाही गणराज्य म्हणून भारत अग्रेसर झाला. यावेळी, भाजपा जिल्हाउपाध्यक्ष सुधाकरराव देशमुख धानोरकर,ग्रामसेवक सोनसळे साहेब, दत्तराव देशमुख,दिगांबर जगताप,पत्रकार उद्धव मामडे,उपसरपंच कैलासराव देशमुख, गंगाधर मामडे,भगवानराव सर्जे, तंटामुक्त अध्यक्ष दत्तात्रय पाटील मुंगल, उद्योजक धनंजय सलगरे,ज्ञानेश्वर मामडे,भगवान सिदेवाड,ग्रा.पं.सदस्य काळबा वाघमारे बाबुराव कंधारे,पो.पा.राहुल पांचाळ, शिवाजी डोकळे,बंडु सर्जे, मा.तंटामुक्त अध्यक्ष अनिल सर्जे सलगरे दत्ता,शंकर माणिके,शंकर वाडीकर, पंढरी डवरे,रवि पाचाळ, लक्ष्मण चंबोले,आतिश पाटील रापतवार,भिमराव कंधारे यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिकांसह शाळेचे विद्यार्थी शिक्षक वृंद अंगणवाडी आरोग्य कर्मचारी बहुसंख्य उपस्थित होते.

सुधाकरराव देशमुख धानोरकर यांनी ७६ व्या प्रजासत्ताक दिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या आहेत.

# गंजगाव जिल्हा परिषद डिजिटल शाळा
# जिल्हास्तरीय हकेथान स्पर्धेत प्रथम क्रमांक

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
**बिलोली गौतम गावंडे**

बिलोली तालुक्यातील मौजे गंजगाव येथिल जिल्हा परिषद डिजिटल शाळा आसुन शाळेला आसा निसर्गरम्य वातावरणात व शिक्षकांची अभ्यासु वृत्ती विद्यार्थ्यांना त्यांच्यात आत्मविश्वास वाठवावा म्हणून नेहमी ही शाळा आनेक स्पर्धा घेत आसते त्याचातच जिल्हास्तरीय हॅकेथॉन स्पर्धेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गंजगाव प्रथम क्रमांक पटकावून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आसुन हॅकेथॉन स्पर्धेत सहभागी विद्यार्थीनी पुनम शेवाळे व सुहाना शेख यांनी शिक्षक श्री. स्वप्निल यरसनवार सर , श्रीमती शितल कंधारे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली आपला प्रयोग यशस्वी केला आसुन मुख्याध्यापक श्री. रायकंटवार सर,श्री.जामनोर सर श्री.मेहत्री सर, श्री भांगे सर. केंद्रप्रमुख श्री. स्वामी सर या सर्वांचे गट साधन केंद्र बिलोली व ग्रामपंचायत कार्यालय गंजगाव तर्फे २६ जानेवारी २०२५ रोजी सरपंच सौ. सुनिता कनशेटे, उपसरपंच रेखा बावलगावे यांनी हॅकेथॉन स्पर्धेत सहभागी विद्यार्थी पुनम शेवाळे व सुहाना शेख व मार्गदर्शक शिक्षिका शितल कंधारे मॅडम व शिक्षक स्वप्निल यरसनवार यांचा सत्कार करण्यात आला आसुन मार्गदर्शक शिक्षिका व शिक्षक यांचे गावातील नागरिकांनी आभार माणले गटशिक्षणाधिकारी श्री.बी.एम. पाटील ,सरपंच प्रतिनिधी हाणमंतराव कनशेटे, माजी सरपंच प्रतिनिधी वैभव घाटे, सामाजिक कार्यकर्ते मारोती घाटे, माधवराव घाटे, माणिकराव बासरे, रामराव पाटील ,शालेय समितीचे आजी माजी अध्यक्ष शाळेचे अभिनंदन करुन राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबदल पालकवर्गातुन पुढील स्पर्धेसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत



## नामांकित मल्ल साहेबराव लहानु शिनगिरे उर्फ साहेबा पैलवान यांचे दुःखद निधन

**लोकनेता न्युज नेटवर्क आष्टी**

तालुक्यातील वटणवाडी येथील नामांकित मल्ल साहेबराव लहानु शिनगिरे उर्फ साहेबा पैलवान यांचे आज सकाळी



दि.२४ रोजी भवरवाडी येथे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले आहे. त्यांचा दशक्रिया विधी दिनांक २ फेब्रुवारी रोजी होणार आहे.

त्यांच्या पाठीमागे पत्नी,चार मुले, तीन मुली,नातवंडे, सूना असा त्यांचा मोठा परिवार आहे. त्यांच्या जाण्याने वटणवाडी व भवरवाडी या गावांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे. ते कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक तथा वटनवाडी सहकारी सेवा सोसायटी चेअरमन भगवानराव शिनगिरे यांचे चुलते होते.

## आमदार राहुल कुल यांच्या हस्ते भीमा पाटस कारखान्याचा ध्वजारोहण संपन्न

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
**दौंड (बबनराव धायतोंडे)**

:- ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त भीमा पाटस सहकारी साखर कारखान्याच्या कार्यस्थळावर ध्वजारोहण समारंभ पार पडला.यावेळी राष्ट्रीय ध्वजाला आमदार राहुल कुल यांनी अभिवादन केले,प्रजासत्ताक दिन हा आपल्या देशाच्या गौरवशाली लोकशाही मूल्यांचे प्रतीक आहे. देशसेवा, एकता आणि प्रगतीच्या दिशेने आपण सर्वजण पुढे जाऊया असे विचार यावेळी कुल यांनी व्यक्त केले.

तसेच यावेळी त्यांनी उपस्थित लहान मुलांनाशी आणि कामगार बांधवंशी संवाद साधला.आणि उपस्थित सर्वांना प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने शुभेच्छा दिल्या.



# संजय गांधी विद्यालय कलंबर च्या संरक्षक भिंतीच्या बांधकामांचे भुमीपुजन संपन्न

**लोकनेता न्युज नेटवर्क**
**नांदेड बाजीराव गायकवाड**

२६ जानेवारी २०२५ रविवार रोजी भारतीय प्रजासत्ताक दिनी संजय गांधी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,

कलंबर येथील शाळेच्या भव्यदिव्य अशा संरक्षक भिंतीच्या बांधकामांचे भूमीपूजन समाज उन्नती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, मा.मारोतराव पाटील घोरबांड व शाळेचे मुख्याध्यापक मा.सुर्यकांतराव मामडे सर यांच्या शुभहस्ते श्रीफळ फोडून सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या उपस्थित संपन्न झाला.



इंजिनिअर च्या मार्गदर्शनानुसार मजबूत आणि टिकाऊ संरक्षक भिंत, चारचाकी वाहनांसाठी व पैदल चालण्यासाठी वेगवेगळे भव्यदिव्य दोन मेन गेट, संपुर्ण मैदान सपाटीकरण, वाहनांची पार्किंग तसेच विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी पुरेसे मोकळे मैदान या स्वरुपात संपूर्ण काम अवघ्या काही दिवसांत पूर्ण होणार आहे.

अवघ्या काही दिवसांवर सेवानिवृत्ती जवळ आलेले मुख्याध्यापक श्रीमान सुर्यकांतराव मामडे सरांनी या सर्व कामांची जबाबदारी स्विकारून हे काम पुर्ण करण्याची हमी स्वतः घेतली आहे.हि शाळेसाठी मोठी भेट आहे.यामुळे सर्वच स्तरातून मामडे सरांचे कौतुक होत असून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

यावेळी समाज उन्नती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मारोतीराव पाटील घोरबांड साहेब, मुख्याध्यापक सुर्यकांतराव मामडे सर, प्राध्यापक, प्राध्यापिका, अध्यापक, अध्यापिका,शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# जिल्ह्याची आता परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल - पालकमंत्री ना. मकरंद पाटील

## बुलढाणा जिल्हा भक्ती-शक्तीचा सुरेख संगम

**लोकनेता न्युज नेटवर्क**

**बुलढाणा (ज्ञानेश्वर बुधवत** बुलढाणा जिल्हा हा भक्ती-शक्तीचा सुरेख संगम आहे. जिल्ह्यातील कृषी, उद्योग, आरोग्य, शिक्षण, पर्यटन, पायाभूत सुविधा अशा विविध क्षेत्रातील विकासातुन जिल्ह्याची परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल सुरू झाली आहे. या सर्वांगीण विकासाच्या वाटचालीत बुलढाणा जिल्हा आता थांबणार नाही, यासाठी मी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंद पाटील यांनी आज केलेङ्ङदेशाच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त पोलीस कवायत मैदानात पालकमंत्री ना. पाटील यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी संबोधित करताना ते बोलत होते. यावेळी आमदार संजय गायकवाड, मनोज कायंदे, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, पोलीस अधीक्षक विश्व पानसरे, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात, अपर जिल्हाधिकारी सदाशिव शेलार यांच्यासह प्रशासनातील अधिकारी, विभाग प्रमुख, स्वातंत्र सेनानी, वीरमाता, वीरपत्नी, ज्येष्ठ नागरिक, शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.ङ्ङपालकमंत्री ना. पाटील म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नेतृत्वात आता बुलढाणा जिल्ह्याच्याही विकासाला नक्कीच गती मिळणार आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी सुरुवातीच्या पहिल्या शंभर दिवसांचा आराखडा तयार केला असून त्यानुसार राज्य सरकार काम करणार आहे. यात बुलढाण्याचे मोलाचे योगदान राहील. बुलढाणा हे विदर्भाचे प्रवेशद्वार, भक्ती-शक्तीचा सुरेख संगम, स्वराज्याचे आजोळ आणि आधुनिक संत विचारांचे माहेरघर आहे. शूर सरदार लखोजी जाधवराव यांच्या घरात स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ आई साहेबांचा जन्म सिंदखेडराजा या ऐतिहासिक गावी झाला असून हे मातृतीर्थ आपल्यासाठी प्रेरणास्त्रोत आहे.

आपल्या देशाची कृषि प्रधान देश म्हणून जगभरात ओळख आहे. त्याचप्रमाणे आपला जिल्हाही कृषि प्रधान आहे. शेतकऱ्यांच्या परिश्रमामुळे गेल्या हंगामात जिल्ह्याची सोयाबीनची उत्पादकता देशाच्या सरासरीपेक्षा अधिक राहिली आहे. बदलत्या वातावरणामुळे शेतीवर होणाऱ्या विपरीत परिणामावर मात करण्यासाठी शेतकऱ्यांनी पीक पद्धतीत बदल करण्याची गरज आहे. ही गरज ओळखून जिल्ह्यात या चालू वर्षात १४ हजार हेक्टर क्षेत्रात संत्रा, मोसंबी, सीताफळ, केळी, पेरू, आंबा या फळपिकांची लागवड करण्यात आली आहे. सेंद्रिय शेतीचे क्षेत्रही वाढत असून ते आता आठ हजार हेक्टरपर्यंत पोहोचले आहे. आगामी काळात भाजीपाला, तेलबिया आणि बियाणे उत्पादन केंद्र विकसित करण्यावर भर दिला जात आहे. तसेच बियाणे उत्पादनात शेतकऱ्यांनी दिलेल्या योगदानामुळे सोयाबीन बियाण्यांच्या उत्पादनात जिल्हा अव्वल राहिला आहे. यंदाच्या आर्थिक वर्षाच्या खरीप हंगामामध्ये सुमारे सात लाख पस्तीस हजारपेक्षा जास्त तर रब्बी हंगामामध्ये सव्वा तीन लाखांपेक्षा जास्त हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. यावर्षी एक लाख बारा हजार हेक्टर क्षेत्रावर निर्मित सिंचन क्षमता निर्माण करण्याचे नियोजन आहे. सूक्ष्म सिंचन योजनेंतर्गत पंचाहत्तर हजार हेक्टरपर्यंत सिंचन क्षेत्रामध्ये वाढ झालेली आहे. गतवर्षी खरीप हंगामावर अतिवृष्टीमुळे काही तालुक्यातील पिकांवर संकट आले. या नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्यात आले. प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत सन २०२३-२४ मध्ये खरीप व रब्बी हंगामातील ४९७ कोटी रुपयांची नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली आहे. अवेळी पाऊस अतिवृष्टी पूर, आणि दुष्काळ बाधित नऊ लाख शेतकऱ्यांना आतापर्यंत ८१५ कोटी रुपयांची नुकसान भरपाई मदत व पुनर्वसन विभागामार्फत देण्यात आलेली आहे. या मदतीपासून वंचित असलेल्या शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळवून देण्यासाठी शासन पुरेपूर प्रयत्न करीत आहे. ङ्ङशासनाने शेतकऱ्यांसाठी शेतमाल तारण योजना व ई-नाम योजना सुरू केली आहे. या



योजनेअंतर्गत जिल्ह्यातील सात कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांना ई-लिलाव पद्धतीने आपला शेतमाल विक्री करण्याची सुविधा उपलब्ध झाली असून आतापर्यंत सुमारे ३० हजार शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे. वर्षाअखेर जवळजवळ पस्तीस लाख क्विंटल शेतमालाची विक्री झाली आहे. यातून सुमारे १३०० कोटी रुपयांहून अधिक रकमेची उलाढाल झाली असून शेतकऱ्यांना आपल्या शेतमालाला योग्य भाव मिळण्यास मदत झाली आहे, ही मोठी उपलब्धी आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी हमीभाव व बाजारभावासाठी नजीकच्या कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये ई-नाम प्रणालीवर नोंदणी करुन जास्त भाव देणाऱ्या व्यापाऱ्याकडेच शेतमाल विक्री करावी, असे आवाहन पालकमंत्री ना. पाटील यांनी यावेळी केले. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसायाचा विस्तार हा जिल्ह्यातील ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाचा घटक आहे.

यावर्षी एक लाख सत्तेचाळीस हजार लिटर दूध उत्पादन झाले आहे. याबरोबरच मत्स्यबीज उत्पादन वाढविण्यावर देखील भर दिला जात आहे आणि शेतकऱ्यांची औद्योगिक क्षमता वाढविण्याच्या दृष्टीने जिल्ह्यात ३ हजार २१५ शेतकरी उत्पादक संस्था तर २०२ शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन झाल्या आहेत, अशी माहिती त्यांनी यावेळी दिली. जिल्ह्यात जिगांव, राहेरा, आलेवाडी हे प्रमुख सिंचन प्रकल्प होत आहेत. जिगांव प्रकल्पातून सव्वा लाख हेक्टर क्षेत्रापैकी माहे जून २०२५ पर्यंत दहा हजार हेक्टर, राहेरा लघु सिंचन प्रकल्पातून मार्च २०२५ पर्यंत ४६५ हेक्टर तर आलेवाडी लघु सिंचन प्रकल्पातून जून २०२५पर्यंत ७५० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. जिगांव, राहेरा, आलेवाडी या तीनही सिंचन प्रकल्पाचा तीनशे गावांना लाभ होणार आहे. जिल्ह्यात एकूण ३५ हजार ३११ कोटी रुपयांचे सिंचन प्रकल्प प्रगतीपथावर आहेत. या सिंचन प्रकल्पातून एक लाख बारा हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.जिल्ह्याच्या विकासासाठी महत्त्वाचा मानला जाणारा १३९ दशलक्ष घनमीटर साठवण क्षमतेचा वैनगंगा-नळगंगा नदी जोड प्रकल्प ८८ हजार ५७५ कोटी रुपये खर्चाचा असून, यामध्ये ३८६ मीटर लांबीच्या कालव्याचे बांधकाम प्रस्तावित आहे. यात नळगंगा, कोलोरी आणि शेलोडी हे तीन प्रकल्प प्रस्तावित केले आहेत. या प्रकल्पामुळे बुलढाण्यातील सुमारे ३८ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. हा प्रकल्प जिल्ह्याच्या जलसंधारण आणि कृषी विकासात मोठी भूमिका बजावेल, अशी अपेक्षा पालकमंत्री यांनी व्यक्त केली. जिल्ह्यातील जिगाव, वैनगंगा-नळगंगा नदी जोड प्रकल्प, सिंदखेडराजा विकास आराखडा, ऐतिहासिक लोणार सरोवर विकास आराखड्यातील कामे, जिल्ह्यातील रस्ते विकास इत्यादी प्रकल्पांना पुढील काळात गती देऊन पूर्ण करण्याचा माझा मानस आहे. याशिवाय शिक्षण, आरोग्य, कृषी क्षेत्रात भरीव कामगिरी करण्यासाठी मोठा वाव असून या क्षेत्रांचा विकास करण्यात कोणत्याही प्रकारचा हात आखडता न घेता प्राधान्य देण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेंतर्गत जिल्ह्यात आतापर्यंत एक लाख पासष्ठ हजार शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेंतर्गत जिल्ह्यात दोन हजार एकरात ९१ उपकेंद्राद्वारे ४०१ मेगावॅट वीज निर्मितीचे उद्दिष्ट आहे. यापैकी पळशी आणि बोरी येथे दोन सौर प्रकल्प कार्यान्वित करण्यात आले असून उर्वरित ६७ प्रकल्प प्रगतीपथावर आहेत. या प्रकल्पांतून शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठ्याची सुविधा उपलब्ध केली जात आहे. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, प्रधानमंत्री अन्न प्रक्रिया आणि मुद्रा योजना या सारख्या योजनांद्वारे जिल्ह्यात नवउद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी अल्प दराने कर्ज सवलत देवून त्यांच्या प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. या योजनांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होत आहे. जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्राच्या विस्ताराच्या दृष्टीने मोताळा येथे नविन एमआयडीसी प्रस्तावित करण्यात आली असून खामगांव आणि देऊळगांव राजा येथील औद्योगिक क्षेत्राचे विस्तारीकरण प्रस्तावित आहे. याद्वारे स्थानिक युवकांना नोकऱ्या व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न राहणार आहे. समृद्धी महामार्गांतर्गत सिंदखेडराजा तालुक्यातील सावरगाव माळ, निमखेड व गोळेगाव आणि मेहकर तालुक्यात साब्रा-काब्रा या दोन नवीन टाउनशिप प्रस्तावित आहेत. हा प्रकल्प बुलढाणा जिल्ह्याच्या औद्योगिक व आर्थिक विकासाला चालना देईल, असा विश्वास पालकमंत्री यांनी व्यक्त केला. ङ्ङजिल्ह्यात अकोला-खंडवा हा २३ किलोमीटर लांबीचा रेल्वे मार्ग आणि जालना- खामगाव हा १६२ किलोमीटर लांबीचा रेल्वे प्रकल्प बांधणीचे काम लवकरच सुरु होणार आहे. प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा जोतीराव फुले जन आरोग्य योजना या एकत्रित आयुष्मान भारत योजनेंतर्गत आतापर्यंत जिल्ह्यात सव्वा सात लाखापेक्षा अधिक आयुष्मान कार्ड वितरित करण्यात आले असून ९० हजार रुग्णांनी योजनेचा लाभ घेतला आहे. तसेच बुलढाणा येथे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या इमारतीकरिता ४०३ कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला असून सध्या त्याचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. तसेच जळगाव जामोद येथे नवीन आयुर्वेद महाविद्यालयाकरीता जागा उपलब्ध करुन देण्यात आली असून यास देखील लवकरच अंतिम मान्यता प्राप्त होणार आहे.ङ्ङबुलढाणा जिल्ह्याच्या पर्यटन आणि आदरातिथ्य क्षेत्राचा विकास जलदगतीने होत आहे. शेगाव विकास आराखड्यातील सर्व कामे पूर्ण झाली आहेत. लोणार सरोवर विकास आराखड्याची अंमलबजावणी सुरु असून सिंदखेडराजा विकास आराखड्यासाठी २३३ कोटी रुपयांचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. तसेच ज्ञानगंगा, अंबाबर्वा अभयारण्य, मियावाकी, इकोटुरीझम, ॲग्री टुरीझमला देखील प्रोत्साहन दिले जात आहे. या उपक्रमातून जिल्ह्यात पर्यटन विकास आणि रोजगाराच्या मोठ्या संधी निर्माण होणार आहे. यासह जंगल संसाधने आणि वन्य परिसरात राहणाऱ्या ग्रामस्थांचा प्रामुख्याने विचार करुन या भागातील आदिवासी बांधवांना मदत करण्यास आगामी काळात प्राधान्य दिले जाईल.

शहरी व ग्रामीण भागातील वंचित व गरजू लोकांना हक्काचे घर मिळावे यासाठी जिल्ह्यात शबरी आवास, रमाई आवास, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर धनगर आवास, मोदी आवास, प्रधानमंत्री आवास इत्यादी विविध आवास योजना राबविण्यात येत आहे. जिल्ह्यात चालू वर्षात एकूण १७ हजार ५५ घरकुलांकरीता २६७ कोटी रूपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत जिल्ह्यातील सुमारे साडेसहा लाख महिलांना दरमहा पंधराशे रुपयांची मदत देण्यात आली आहे. जिल्ह्याचा सर्वांगीण विकास साधताना सामाजिक स्तरही उंचावण्यासाठी समाज कल्याण विभागामार्फत मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह, निवासी शाळा, आश्रमशाळा, स्वाधार योजना, भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना, मुलींच्या विवाहासाठी कन्यादान योजना इत्यादी विविध योजना शासनाकडून राबविण्यात येत आहे. यामुळे समाजातील मागे पडलेल्या वंचित घटकाला विकासाच्या मुख्य प्रवाहात सामिल करून घेण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.ङ्ङभारतीय संविधान हे जगातील सर्वोत्तम संविधान आहे. या संविधानामुळे राष्ट्र निर्माणासाठी हातभार लागला आहे. प्रत्येक नागरिकाने सकारात्मक विचारातून प्रगतीकडे वाटचाल करण्याचा संकल्प करावा. येत्या काळात आपण सर्व जण चिकाटीने देशाला प्रगतीपथावर नेऊ, असे आवाहन पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांनी यावेळी केले.

प्रजासत्ताक दिनानिमित्त विविध क्षेत्रात उल्लेखनिय कार्य केलेल्या अधिकारी, कर्मचारी व खेळाडूंना पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांच्या हस्ते मानचिन्ह, प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी ध्वजदिन निधी संकलन २०२३ चे बुलढाणा जिल्ह्याचे १०४ टक्के उदिष्ट पूर्ण केल्याबद्दल जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील व जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी स्कॉ. लिडर रुपाली सरोदे यांना स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आले. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाचे उत्कृष्ठ महसूल अधिकारी म्हणून अपर जिल्हाधिकारी सदाशिव शेलार, तहसिलदार निलेश मडके, नायब तहसिलदार प्रविण घोटकर यांच्यासह आपत्ती व्यवस्थापन विभाग, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालय, निवडणूक विभाग, जिल्हा क्रीडा कार्यालयातील खेळाडू, समाजकल्याण कार्यालय, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणाचे अधिकारी व कर्मचारी यांचा गौरव करण्यात आला. तसेच शेगाव तालुक्यातील ११ गावामध्ये केस गळती प्रकरणी प्रशासनाला केलेल्या सहकार्याबाबत बोंडगावचे माजी सरपंच रामेश्वर थारकर यांचा सत्कार करण्यात आला. तसेच ॲलीमको व जिल्हा प्रशासनामार्फत दिव्यांगाना विनामुल्य व्हिल चेअर, रोलेटर, एलबो क्रंच आणि टायसिकल व बॅटरी मोटर सायकलचे वाटप करण्यात आले. ॲग्रीस्टॅक उपक्रमातंर्गत फार्मर आयडी प्राप्त केलेल्या शेतकऱ्यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. ङ्ङप्रजासत्ताक दिनाच्या मुख्य समारंभात पोलीस विभागाने शानदार पथसंचलन केले. त्यानंतर शालेय विद्यार्थ्यांव्दारे बॅण्ड ड्रिल, डंबेल्स कवायत, डिश कवायत, ॲरोबिक्स डान्स व कराटे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. यावेळी प्रेक्षकांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणाला दाद दिली. कार्यक्रमाचे संचालन चंद्रशेखर जोशी व श्री. मोरे यांनी केले.

# दीनदयाल विद्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा



**लोकनेता न्युज नेटवर्क**

**देऊळगाव राजा :-** शिक्षण प्रसारक मंडळ चिखली द्वारा संचालित स्थानिक दीनदयाल विद्यालय व कनिष्ठ कला आणि विज्ञान महाविद्यालय दे.राजा जि बुलढाणा येथे २६ जाने. प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

प्रसंगी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव मा.प्रेमराजसेठ भाला यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.सामूहिकरीत्या संविधानाच्या उद्देशपत्रिकेचे वाचन शारीरिक शिक्षक श्री.राजूसिंग राठोड यांच्या नेतृत्वात करण्यात आले.ध्वजारोहण प्रसंगी नगरातील तसेच परिसरातील नागरिकांसह विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी उपस्थित होती. शासनाच्या परिपत्रकात नमूद केल्या प्रमाणे विविध स्पर्धासह देशभक्तिपर सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.या मध्ये रांगोळी स्पर्धा,चित्रकला,कविता वाचन, गीत गायन,नृत्य,निबंध इत्यादी स्पर्धा यशस्वीपणे पार पडल्या. या संपुर्ण कार्यक्रमादरम्यान संस्थेचे सचिव मा.प्रेमराजसेठ भाला,संचालक मा.बाबासाहेब मिनासे विद्यालयाचे प्राचार्य श्री. एस.बी.गारडे सर पर्यवेक्षक श्री. एस. एन. व्यास सर याच्यासह सर्व शिक्षक,शिक्षिका,तसेच शिक्षकेतर कर्मचारी बंधू भगिनी उपस्थित होत्या.सादर झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रिया भवर व सोनल जोशी मॅडम यांनी केले तर श्री.सरोदे सर यांनी उपस्थितांचे आभार मानले शेवटी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# लाडक्या बहिणींचे ३० लाख अर्ज बाद होणार? आदिती तटकरे

**लोकनेता न्युज नेटवर्क**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा सातवा हप्ता पात्र महिलांच्या खात्यात जमा झाला आहे. पहिल्या दिवशी १ कोटी ७ लाख महिलांना हा लाभ मिळाला तर दुसऱ्या दिवशी १ कोटी २५ लाख महिलांना लाभ मिळाला. दरम्यान, या योजनेतील ३० लाख अर्ज बाद होण्याच्या मार्गावर असल्याचे वृत्त काही ठिकाणी छापून आले आहे. मात्र, या अपप्रचारावर विश्वास न ठेवण्याचं आवाहन महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी केलं आहे. त्या रायगड येथे टीव्ही ९ मराठीशी बोलत होत्या.३० लाख अर्ज बाद होण्याच्या मार्गावर आहेत, याबाबत आदिती तटकरे




यांना विचारलं असता त्या म्हणाल्या, मला माहीत नाही हा आकडा कुठून येतो. पण माझी सर्व लाडक्या बहिणींना विनंती आहे की अशा कोणत्याही बातम्या आणि अफवांना बळी पडू नका. २ कोटी ४१ लाख महिलांच्या खात्यात लाभ थेट हस्तांतरण करण्यात आलं आहे.''अपप्रचारा बळी पडू नका''पहिल्या दिवशी १ कोटी ७ लाख महिलांना लाभ दिला तर काल सुद्धा १ कोटी २५ लाख महिलांना लाभ वितरित झाला आहे. लाभार्थ्यांचं वितरण नेहमीप्रमाणेच सुरू आहे. ऑक्टोबरमध्ये ९ तारखेला २ कोटी ३४ लाख महिलांना लाभ दिला होता. आता लाभ वितरण २ कोटी ४१ लाख महिलांना झालेला आहे. कोणत्याही अफवांना आणि अपप्रचारांना बळी पडू नये'', असं आदिती तटकरे म्हणाल्या.सातवा हप्ता येण्यास सुरुवात जुलै २०२४ च्या पावसाळी अधिवेशनात तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना कार्यान्वित केली. या योजनेअंतर्गत पात्र महिलांना दरमहा १५०० रुपये देण्याचे निश्चित करण्यात आले. त्यानुसार, अटी शर्थींच्या आधारे सरकारने महिलांकडून अर्ज भरून घेतले अन् पात्र महिलांच्या खात्यात पैसे जमा करण्यास सुरुवात केली. आतापर्यंत सहा हप्ते पात्र महिलांच्या खात्यात जमा झाले आहेत, जानेवारीचा सातवा हप्ताही पात्र महिलांच्या खात्यात जमा होण्यास सुरुवात झाली आहे.



# समर्थ कृषी महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन साजरा.

**लोकनेता न्युज नेटवर्क**

**देऊळगाव राजा (ज्ञानेश्वर बुधवत)**

समर्थ कृषी महाविद्यालय, देऊळगाव राजा येथे श्री गजानन महाराज कृषी व शैक्षणिक संस्थेचे अध्यक्षा श्रीमती नंदाताई कायंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे सचिव सतीश कायंदे, प्राचार्य डॉ.नितीन मेहेत्रे, प्राचार्य डॉ, प्रफुल्ल ताठे, प्राचार्य योगेश ताठे, प्राचार्य सचिन घुगे, प्रा गबाजी कुटे, वसंत नागरे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती नंदाताई कायंदे यांनी प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व सांगताना मनात स्वातंत्रता, शब्दात ताकद, हृदयात अभिमान पाहिजे व आपण सर्वांनी देशाच्या रक्षणाची शपथ घेतली पाहिजे असे विद्यार्थ्यांना सांगितले तसेच प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन मेहेत्रे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तसेच सूत्रसंचालन व आभार रासेयो सह कार्यक्रम अधिकारी प्रा अश्विनी जाधव यांनी केले. यावेळी समर्थ कृषी महाविद्यालय, समर्थ औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, समर्थ स्कूल ऑफ नर्सिंग व समर्थ उच्च माध्यमिक महाविद्यालयाचे कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# 'विंग्स –बर्ड्स ऑफ इंडिया' फेब्रुवारीत

**लोकनेता न्युज नेटवर्क** पुणे : पक्षी निरीक्षण कार्यक्रमांपैकी एक 'विंग्स



'विंग्स –बर्ड्स ऑफ इंडिया' पक्षी निरीक्षण कार्यक्रमाचे १६ फेब्रुवारी रोजी मुंबई आणि नवी मुंबईत आयोजन करण्यात आले आहे. पक्षी संवर्धन आणि पर्यावरण जागरूकता वाढविणे हा या कार्यक्रमाचा उद्देश असून सर्वात मोठ्या –बर्ड्स ऑफ इंडिया' समजला जातो.

यापूर्वी २००५ पासून हा कार्यक्रम 'बर्ड रेस ऑफ इंडिया' या नावाने कार्यक्रम आयोजित करण्यात येत होता. भारतातील १४ शहरांमध्ये हे पक्षी निरीक्षण आयोजित करण्यात येते. यामध्ये दरवर्षी ५० हून अधिक पक्षी निरीक्षक संघ सहभागी होतात. प्रत्येक संघातील व्यक्ती या कार्यक्रमात सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत पक्षी निरीक्षण करून त्यांच्या नोंदी करू शकतात.

या नोंदी नंतर विंग्स –बर्ड्स ऑफ इंडियाच्या संकेतस्थळावर नोंदविण्यात येतात. याशिवाय, दुर्मिळ पक्ष्यांची नोंदही करण्यात येतात.

पहिल्याच दिवशी ११२ रुपयांत तिकीट; 'फसक्लास दाभाडे' चित्रपटाची प्रेक्षकांसाठी खास ऑफरदरम्यान, या पक्षी निरीक्षण कार्यक्रमाची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत आहे. पक्षी अभ्यासकांसाठी हा एक महत्त्वाचा कार्यक्रम आहे. यावर्षी अधिक संघ सहभागी होण्याची शक्यता आहे. असे पक्षी निरीक्षण कार्यक्रमाचे मुख्य आयोजक संजॉय मोंगा यांनी सांगितले. तसेच यंदा पक्षी संवर्धनावरील विशेष व्याख्याने देखील आयोजित करण्यात आली आहेत. या कार्यक्रमाची संपूर्ण माहिती विंग्स –बर्ड्स ऑफ इंडिया संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

# 'एक देश एक निवडणूक'चे समर्थन राष्ट्रपतींकडून सुशासनाची गरज अधोरेखित



**लोकनेता न्युज नेटवर्क**

**नवी दिल्ली :** एक देश एक निवडणूक या धोरणामध्ये प्रशासनातील ताळमेळ वाढवून, धोरण लकवा रोखून, साधनसंपत्तीचा चुकीचा वापर कमी करून आणि राज्यांवरील आर्थिक भार कमी करून सुप्रशासनाची परिभाषा बदलण्याची क्षमता आहे, अशा शब्दांमध्ये राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी शनिवारी या धोरणाचे समर्थन केले.

प्रजासत्ताकदिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्राला उद्देशून केलेल्या भाषणामध्ये राष्ट्रपतींनी नवीन फौजदारी कायद्यांचा उल्लेख करताना 'अनेक दशके देशामध्ये रेंगाळत असलेल्या गुलामगिरीच्या मानसिकतेचे अवशेष काढून टाकण्याच्या प्रयत्नां'ची प्रशंसा केली. राष्ट्रपती म्हणाल्या की, ''आपण ही मानसिकता बदलण्यासाठी केल्या जाणाऱ्या एकत्रित प्रयत्नांचे साक्षीदार आहोत. इतक्या मोठ्या प्रमाणात सुधारणा करण्यासाठी धाडसी दूरदृष्टी आवश्यक आहे.''

संविधानाचे महत्त्व याबद्दल बोलताना मुर्मू यांनी गेल्या ७५ वर्षात देशाने साध्य केलेल्या प्रगतीचा उल्लेख केला.

स्वातंत्र्याच्या वेळी देशातील अनेक भागांमध्ये कमालीची गरीबी आणि भुकेची समस्या होती. मात्र, आपण स्वत:वर विश्वास ठेवला आणि वाढीसीठी परिस्थिती निर्माण केली, असे प्रशंसोद्गार त्यांनी काढले. शेतकरी आणि श्रमिकांनी दिलेल्या योगदानामुळे भारताची अर्थव्यवस्था जागतिक पातळीवर महत्त्वाचा भूमिका बजावत आहे, त्याच्या मुळाशी राज्यघटनेने प्रस्थापित केलेली चौकट आहे, असे त्या म्हणाल्या. अलिकडील वर्षांमध्ये देशाने सातत्याने उच्च आर्थिक वाढीचा दर राखला असून त्यामुळे रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत, शेतकरी व मजुरांचे उत्पन्न वाढले आहे आणि अनेकांना दारिद्र्यरेषेच्या बाहेर काढले आहे. सर्वसमावेश वाढ आणि समाज कल्याणासाठी सरकारची बांधिलकी यांचाही त्यांनी आपल्या भाषणात उल्लेख केला. देशातील मागास समाजगटांसाठी केलेले काम, गृहबांधणी, स्वच्छ पेयजल असे अनेक मुद्दे राष्ट्रपतींनी मांडले.

एक देश एक निवडणूक योजनेचे प्रशासनात सुधारणा आणि कमी होणारा आर्थिक ताण अनेक फायदे आहेत. या विधेयकामध्ये देशभरात निवडणुकीच्या वेळापत्रकात सूसुत्रीकरण होणार आहे. द्रौपदी मुर्मू, राष्ट्रपती

# कर्नाटकात भाषावाद उफाळला

**लोकनेता न्युज नेटवर्क** बंगळुरू : कर्नाटकात सध्या भाषिक वाद उफाळून आला असून बंगळुरूत बहुभाषिक लोक राहतात. तिथे स्थानिकांनी परराज्यातून कामासाठी येणा-यांना कन्नड भाषा शिकण्याचा सल्ला दिला आहे. ही प्रादेशिक संस्कृतीचा सन्मान करण्यासारखे आहे असे. त्यातून एका ट्विटर युजरने केलेली पोस्ट चांगलीच व्हायरल झाली असून त्यावर अनेकांनी वेगवेगळ्या प्रतिक्रिया दिल्या आहेत.या ट्विटर पोस्टवर म्हटले आहे की, बंगळुरू उत्तर भारत आणि शेजारील राज्यांसाठी बंद आहे ज्यांना कन्नड शिकायचे नाही या पोस्टवरून नवा वाद निर्माण झाला आहे.




पोस्टमध्ये युजरने जे लोक स्थानिक भाषा आणि संस्कृतीचा सन्मान करणार नसतील त्यांनी बंगळुरूत येऊ नये. बंगळुरू उत्तर भारत आणि इतर राज्यांसाठी बंद आहे ज्यांना कन्नड शिकण्याची गरज वाटत नाही. जे भाषा, संस्कृतीचा सन्मान करत नसतील त्यांची बंगळुरूला आवश्यकता नाही असे म्हटले आहे. ही पोस्ट अनेकांनी शेअर केली असून १ लाखाहून अधिक लोकांपर्यंत पोहचली आहे. त्यावर ७०० हून अधिक कमेंट्स आल्यात.काही युजर्स या पोस्टशी सहमत आहेत तर काहींनी त्याला विरोध केला. एकाने यावर टीका करत दुसरी भाषा शिकणे ही व्यक्तिगत आवड असू शकते आणि कुणी एखाद्यावर थोपवू शकत नाही असे म्हटले आहे. तर दुस-याने मी या पोस्टशी सहमत आहे. परंतु सरकारने बंगळुरू काम करणा-यांसाठी भाषा येणे बंधनकारक केले पाहिजे, जमावाने न्याय करणे त्यावर समाधानकारक तोडगा असू शकत नाही असे सांगितले.एका युजरने त्यावर तिखट प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. बंगळुरू आज दुस-या राज्यातील मेहनती लोकांमुळे अस्तित्वात आहे.

आता जेव्हा इथं सर्वकाही बनले आहे तेव्हा तुम्हाला दुस-या लोकांनी इथून निघून जावं असं वाटते काकन्नड लोक आणि कर्नाटक सरकारची लाज वाटते जे चूपचाप हे पाहतेय असे त्याने म्हटले.

# भगर खाल्ल्याने हिंगोलीच्या तब्बल ५२ भाविकांना विषबाधा



**लोकनेता न्युज नेटवर्क**

श्रीक्षेत्र माहूर : माहूर देवदर्शनासाठी हिंगोली जिल्ह्यातील जवळा बु. येथून पायी दिंडी घेवून आलेल्या भाविकांनी काल रात्री उपवासाची भगर खाल्याने तब्बल ५२ भाविकांना विषबाधा झाल्याची खळबळजनक घटना माहूर येथील देवदेवेश्वर रोडवरील मठात घडली असून विषबाधा झालेल्या भाविकांना काल रात्री उशीरा माहूरच्या ग्रामीण रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे. डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार संबंधित रूग्णांची प्रकृती स्थीर असून कोणत्याही प्रकारची चिंताजनक बाब नसल्याचे प्रशासनाच्या वतीने तहसिलदार किशोर यादव यांनी सांगितले आहे.

माहूर गडावर ठाकूर बुवा यात्रेनिमित्त हजारो भाविक दिंड्याद्वारे माहूर गडावर दाखल होत आहेत माहूरगडावरील देवदर्शनासाठी हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव तालुक्यातील मौजे जवळा (बु.) येथील जवळपास दोनशे भाविकांची पायी दिंडी माहूर येथे दर्शनासाठी आली होती. दरम्यान काल दि. २५ जानेवारी रोजी रात्री ८ वा. च्या सुमारास दिंडीतील भाविकांसाठी त्यांनी फराळासाठी भगर केली होती. ती दिंडीतील जवळपास सर्वच भाविकांनी खाल्ली.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904